ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

16.

# भाषा अस्तिवावरील संकट : एक समाजिक चिंतन

**प्रा. विलास सोमाजी पवार**
'समाजशास्त्र विभाग'
आदर्श महाविद्यालय, हिंगोली
vilassomajipawar@gmail.com
९४०३२२५२५४

**प्रस्तावना :-**

कोणत्याही समुदायातील व्यक्तीला आपलीच बोलीभाषा अत्यंत गोड वाटत असते. तिच्यामध्ये आलेपणाचा सुगंध येत असतो. आपण जागच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात गेलो असता जेंव्हा आपल्या समुदायातील लोकांशी भेट होऊन त्यांच्याशी आल्या बोलीभाषेत बोलण्याची जेंव्हा संधी मिळते तेंव्हा त्यात आपलेणाची जाणीव होत असते. पण आजकालच्या दिवसात भुमंडळीकरण, उदारीकरण व संचार क्षेत्रातील तंत्रज्ञान यामध्ये जी क्रांती होतांना दिसून येत आहे. त्यामुळे संपूर्ण जगातील अनेक भाषा व बोलीभाषांवर अस्तीत्वाचे संकट साकळून आले आहे. ज्याप्रमाणे वातावरण, हवामान व पर्यावरण यातील होणाऱ्या बदलामुळे संपुर्ण जगाच्या अनेक जीवांच्या प्रजाती लुप्त होऊ लागल्या आहेत. त्याचप्रमाणे गेल्या तीन दशकांच्या अवधीत जगाच्या २५०० पेक्षा अधिक भाषा बोलीभाषा लुप्त झालेल्या आहेत. याबरोबरच जगातील लोकसमुह आपली स्वत:ची संस्कृतीची ओळख विसरत चालले आहेत. त्यामुळे लोकांच्या जीवनातुन आपलेपणाचा सुगंध व आपुलकीची गोडी कमी होऊ लागलेली आहे. ही एक चिंतनाची बाब आहे.

**भाषा अस्तित्वाची समस्या :-**

आजच्या काळात संपुर्ण जगात एकुण किती भाषा व बोलीभाषांचे प्रचलन आहे. या बाबत नेमके सांगणे कठीण आहे. मात्र संयुक्त राष्ट्र संघाच्या पहिल्या "स्टेट ऑफ इन्डीजीन्स पिपल्स रिपोर्ट २००१" नुसार जगात जवळ-जवळ ६९०० भाषा आहेत. यापैकी २५०० भाषा बोलीभाषा यांच्यावर लुप्त होण्याचे संकट कोसळले आहे. यापैकी लुप्त झालेल्या भाषा व बोलीभाषांची संख्या ९०० च्या जवळपास आहे. गेल्या काही वर्षात भाषा, बोलीभाषांचे स्वास्थ्य उत्तरोत्तर ढासाळू लागले आहे. संयुक्त राष्ट्रांनी जेवढ्या भाषा आजारी असल्याचे सांगीतले होते. त्यांच्या मानाने आज अशा लुप्त होत चाललेल्या भाषांची संख्या तीन पटींनी वाढली आहे.

युनोस्कोच्या भाषा ॲटल्स नुसार ज्या देशामध्ये भाषा व बोलीभाषा विलुप्तीचे संकट सर्वात जास्त आहे. त्यात सर्वात प्रथम क्रमांक आपल्या भारताचा असून आज १९६ भाषा, बोलीभाषा लुप्त झालेल्या आहेत, जगात अशा १९९ भाषा व बोलीभाषा आशा आहेत की ज्यांच्या बोलण्यात उपयोग करणाऱ्यांची संख्या १० वर येऊन पोहचलेली आहे. याचप्रमाणे ३९६ अशा भाषा, बोलीभाषा आहेत की ज्यांना केवळ ५० लोकच वापर करीत आहेत. पाच वर्षापुर्वी अशा ४६ भाषा, बोलीभाषा जगात होत्या की त्या बोलू शकणारी व्यक्ती केवळ एकच होती. यापैकी एक भाषा भारताच्या अंदमान-निकोबार बेटांच्या समुहातील लोकांची ही बोलीभाषा हजारो वर्षापासून अस्तीत्वात होती. या भाषेचे नाव भाषा विशेषज्ञांनुसार "बो" असे होते. हि बोलीभाषा बोलणारी शेवटची महिला बोआ सिनिअर ही ८५ वर्षाची होती. तिचेही काही वर्षाआधी निधन झाले आहे. तिच्याबरोबर या बोलीभाषेचे अस्तित्व जगातून कायमचे मिटुन गेले आहे. कोणतीही भाषा व बोलीभाषा लुप्त होऊन जाने ही एक मोठी शोकांतीका आहे, कारण लुप्त होऊन गेलेली भाषा पुन्हा कधीही जिवंत होत नाही.

**भाषा इतिहास :-**

भाषेच्या इतिहासाबाबत सांगावयाचे झाल्यास हा इतिहास जवळ जवळ ७०,००० वर्ष एवढा प्राचिन आहे. आधुनिक काळात आधुनिक पध्दतीने लिहण्यात येत असणाऱ्या लिपियुक्त व त्यानुसार लिहिता येऊ शकणाऱ्या भाषांचा इतिहास फार तर ४ ते ६ हजार वर्ष एवढाच जुना आहे. या भाषेत मानवाचा किती प्राचीन भुतकाळ सुरक्षीत राहिला असेल याची कल्पनाच मानवाला रोमांचीत करू शकणारी आहे. दुर्देवाने आता ती भाषा व तिच्याशी निगडीत असलेला मानवाचा इतिहास नेहमीसाठीच समाप्त झालेला आहे. १९७४ या वर्षी आईल ऑफ मॅन येथे राहणाऱ्या 'मॅकमेनेड मॅडरल' यांच्या मृत्युनंतर "मॅक्स" नावाच्या भाषेचा लोप झाला. २००८ मध्ये अलास्का येथे राहणाऱ्या मॅरी स्मिथ जीस यांच्या निधनानंतर "इयाक" भाषेचे अस्तत्व नष्ट झाले.

**भाषांची भारतातील स्थिती :-**

भारतातील भाषा व बोलीभाषा यांच्या अस्तित्वावर संकटाची सावट पडलेली आहे. यापैकी नऊ बोलीभाषा अशा आहेत की त्या येत्या कोणत्याही दिवशी एकामागुन एक लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. या बोलीभाषा आहेत. दर्मिया, जाद, राजी, चिनाली, गहरी, चघुंहा, स्पिती, कांची व रोंगपा इत्यादी या बोलीभाषा बोलणारे लोक केरळ ५००० ते ३०० एवढे आहेत. या बोलीभाषा उत्तराखंड व हिमालय प्रदेशात बोलल्या जातात.

"पिपल्स लिंग्विस्टीक सर्व्हे ऑफ इंडिया" च्या पाहणीनुसार अरुणाचल प्रदेशात ९० पेक्षा अधिक, महाराष्ट्रात ५० पेक्षा अधिक, गुजरात प्रदेशात ४७, ओरीसा प्रदेशात ४५, ईशान्य क्षेत्रात आसाममध्ये ३५, मेघालय ३१, मणिपुर २८, नागालँड १७, त्रिपुरा १० आणि आदिवासी व भटक्या समुदायातील व अधिसुचीत समाविष्ट नसलेल्या जवळ-जवळ ४०० बोलीभाषा बोलल्या जात आहेत. सर्वात अधिक संकट याच बोलीभाषावर येऊ घातले आहे. ईशान्य भागातील राज्यामध्ये १३० बोलीभाषांवर संकटाचे सावट आले आहे.

भारतात भाषांचा सर्वे सर्वप्रथम १८९८ पासून १९२८ पर्यंत आयरिश भाषेचे विद्वान 'जॉर्ज अब्राहम ग्रियसन' यांनी केले. त्यानंतर १९६१ मध्ये भाषेवर आधारित शिरगणती करण्यात आली. त्यानुसार भारतात एकुण १६५२ मातृभाषा आहेत याची माहिती कळू शकली १९७१ मध्ये पुन्हा भाषेचे सर्वेक्षण करण्यात आले त्यात १००० पेक्षा अधिक बोलीभाषा बोलणारे म्हणून स्विकारण्यात आले. हे अकलन जर 'पिपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे' नुसार पाहिले तर अनेक प्रकारच्या बोलीभाषांची एकुण संख्या १९७१ मध्ये ७८० पर्यंत कमी होऊन गेली होती. याचा अर्थ असा की या कालावधीत कमीत कमी २६० भाषा लुप्त होऊन गेल्या आहेत.

**निष्कर्ष :-**

भाषा व बोलीभाषेच्या अस्तित्वावर साकळून आलेल्या संकटाबाबत सांगावयाचे झाल्यास सामान्यपणे दोन परिक्षेत्राच्या भाषा व बोलीभाषा भारतात सर्वात अधिक प्रमाणात विलुप्त होत चाललेल्या आहेत. त्यातील एक म्हणजे तटवर्ती क्षेत्रात बोलण्यात येणाऱ्या बोलीभाषा लुप्त होत आहेत आणि दुसरे म्हणजे अशा बोलीभाषांचा लोप होत आहे ज्या डिनोटिफाईड कॅटेगरीच्या समुदायात बोलण्यात येतात. उदा. भटक्या, आदिम जमातीत बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषांवर सर्वात अधिक लुप्त होण्याचे संकट आले आहे.

भाषा हे केवळ संपर्काचे साधन नव्हे तर यात त्या-त्या समुदायाचा इतिहास व त्यांच्या वैशिष्ट्येपुर्ण संस्कृतीचा उगम आहे. एक भाषा लुप्त होते तेंव्हात्या भाषेत असलेली समुहाविषयीची माहिती, ज्ञान, लक्षणे इत्यादी सर्व लुप्त होत असतात, हे संस्कृती व इतिहासाच्या दृष्टीने फार मोठे नुकसान आहे. कारण त्या भाषेबरोबरच संपुर्ण समुदायाच्या स्मृतीचा, मुलभुत माहितीचा अचार-विचारांचा, जाणीवांचा लोप होऊन जात असतो.

**उपाय :-**

भाषा व बोलीभाषा नष्ट होऊ न देणे आणि त्यांच्या जीवनाचे व संस्कृतीचे सौंदर्य, सुगंध वाढत रहावे याचे खरे दायित्व तर आपण सर्वांचे आहे. किंवा सामुहीक आहे. पण भारताच्या दृष्टीने त्याचे विशेष महत्व आहे. कारण या देशात सांस्कृतीक आणि भाषा विषयीच्या विविधतेची फार विशाल अशी परंपरा आहे. त्यांचा या बदलत्या आधुनिक परिस्थितीत सांभाण करणे, जोपासणा करणे, संरक्षण करून संवर्धन करणे हे आपले दायित्व ठरते आहे. भाषा व बोलीभाषांवर संक्रामक रोगांचा प्रकोप होत आहे. म्हणून त्यांना वाचविण्यासाठी त्यांच्या स्वास्थावर लवकरात लवकर लक्ष देणे फार गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

१) महाराष्ट्र २००० — संतोष दस्ताने, दस्ताने रामचंद्र आणि कं. सदाशिव पेठ, पुणे

२) अनमोल मिडलस्कुल स्कॉलरशिप परिक्षा — वा.ना. दांडेकर, अनमोल प्रकाशन, पुणे.

३) सामाजशास्त्रीय संकल्पना व व्यप्ती — डॉ. ज्योती डोईफोडे, विद्या बुक्स पब्लिकेशर्स, औरंगाबाद.

४) मागासवर्गीयांचा विकास योजना २०१३-१४ — प्रदिप गायकवाड, समता प्रकाशन, नागपुर

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

५) भाषा :- इतिहास आणि भुगोल ना. गो. कालेलकर

६) आस्मितादर्श : साहित्य आणि संस्कृती डॉ. चिंतामण कांबळे, सुविधा प्रकाशन, पुणे

७) भारतीय समाज आणि सामाजीक समस्या डॉ. भा. कि. खडसे, हिमालय पब्लिसिंग हाऊस, मुंबई

८) भारतीय सामजिक संरचना आणि सामाजिक समस्या रा. ज. लोटे / डॉ. चौहान, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिकेशर्स, नागपुर

❑❑❑